**ठळक बातम्या**

- भारत लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल असा प्रधानमंत्र्यांना विश्वास / दिल्लीतल्या १२ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचा केला प्रारंभ

- महाराष्ट्रातली सहकार क्षेत्राची परंपरा मोठी असून देशाला दिशा देण्याची क्षमता या परंपरेत असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन

- बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या अंतिम सामन्यात भारतावर ६ गडी राखून मात करत ऑस्ट्रेलियाचा ३-१ असा मालिकाविजय / भारताचा जसप्रीत बुमराह ठरला मालिकावीर

**आणि**

- आदिवासी विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते बक्षीस वितरण

**<><><><><>**

भारत लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राजधानी दिल्लीत रेल्वे, मेट्रो आणि आरोग्याशी संबंधित १२ हजार २०० कोटी रुपयांच्या योजनांचं उद्घाटन आणि लोकार्पण झालं, त्यानिमित्तानं रोहिणी इथं झालेल्या कार्यक्रमला ते संबोधित करत होते. येत्या २५ वर्षांत भारत विकसित देश झालेला आपण पाहू असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट... प्रधानमंत्री**

भारतातील मेट्रो रेल्वे सेवेचे जाळे आता एक हजार किलोमीटरपर्यंत विस्तारले असून, भारत सर्वात मोठे मेट्रो रेल्वे सेवा जाळे असलेला जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश बनला असल्याचं त्यांनी सांगितलं. येत्या काळात याबाबतीत आपण भारतातला दुसऱ्या क्रमांकाचं स्थान मिळवून देऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

महाराष्ट्रातली सहकार क्षेत्राची परंपरा मोठी असून देशाला दिशा देण्याची क्षमता या परंपरेत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. ते आज नागपुरात मानेवाडा इथं गांधीबाग सहकारी बँकेच्या इमारतीचं उद्घाटन करताना बोलत होते. सहकार क्षेत्रातल्या संस्थांसाठी विश्वासार्हता आणि गुणवत्ता हेच सर्वांत मोठं भांडवल आहे, असं ते म्हणाले.

विदर्भात सहकार क्षेत्रात कर्मचारी आणि संचालकांना उत्तम प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. निर्णयक्षमता, सांघिक कार्य, यांचं प्रशिक्षण दिलं, तर त्याचा नक्कीच फायदा होईल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

<><><><><>

राज्यात नव्यानं मोठी सहकार चळवळ उभी करण्याची गरज असून येत्या पाच वर्षात १० हजार सहकारी संस्था उभारण्याचं राज्य सरकारचं धोरण आहे, असं सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी म्हटलं आहे. ते आज सोलापूर इथं बोलत होते. पाटील यांनी आपल्या सोलापूर दौऱ्यात सहकार चळवळीचा आढावा घेतला. सहकारी संस्थाना पतपुरवठा करणं आणि वसुली करणं या पलीकडे जाऊन त्यांना सहकारी तत्वावर वेगवेगळे उद्योग करण्याची परवानगी दिली जाईल, असं ते म्हणाले. सहकारी चळवळ टिकवायची आणि वाढवायची असेल तर कायद्यात सुसूत्रता आणून कठोर भूमिका घेणे आवश्यक आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय औष्णिक वीज प्रकल्पात इंधन म्हणून कोळशासोबत बांबू बायोमासचा वापर करण्याचा निर्णय झाला असून शेतकरी उत्पादक कंपन्यांबरोबर त्यासाठी ५० वर्षांचा खरेदी करार करण्यात येईल असं NTPC चे अध्यक्ष गुरदीप सिंह यांनी सांगितलं. NTPC च्या सोलापूर प्रकल्पात दरवर्षी ४० लाख टन कोळसा लागतो. त्यात १० टक्के बांबू बायोमास मिसळलं तर चार लाख टन बायोमासची गरज असणार आहे तेव्हा शेतकऱ्यांनी बांबूलागवडीला प्राधान्य द्यावं, असं आवाहन त्यांनी केलं. सोलापूर इथं झालेल्या बैठकीत ते बोलत होते. मुख्यमंत्री पर्यावरण संतुलित विकास टास्कफोर्सचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांनी सुचवल्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या निर्देशांनुसार ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

एशियन डेवलमेट बँकेमार्फत (ADB) दहा हेक्टर पर्यंत बांबू लागवडीसाठी अनुदानाची योजना आकाराला येत असल्याचं पटेल यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

'शेती क्षेत्रात उत्पादनासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याची गरज ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केली आहे. ते आज चिपळूणमध्ये वाशिष्ठी डेअरीनं आयोजित केलेल्या कृषी आणि पशुधन प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यानं घडलेले बदल शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतात दाखवण्याची गरज आहे, असं ते म्हणाले.

'कोकणात मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन, फळबागा, अन्नधान्य, डाळी या सगळ्यासाठी प्रचंड संधी आहेत. त्या संधीचं सोनं करण्याच्या दृष्टीने पावलं टाकली, तर कोकणाचा चेहरा आणखी बदलेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थितीत आज उत्तर मुंबईत भाजपच्या विशेष सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात झाली. गोयल स्वतः बोरिवली रेल्वेस्थानकाजवळ आयोजित सदस्य नोंदणी अभियानात सहभागी झाले होते. अधिकाधिक नागरिकांनी भाजपाचं सदस्यत्व स्वीकारावं, असं आवाहन गोयल यांनी यावेळी केलं.

आजपासून भाजपानं राज्यव्यापी विशेष सदस्य नोंदणी अभियान सुरु केलं आहे. एका दिवसात किमान २५ लाख नवीन सदस्य नोंदणी करण्याचं मोहिमेचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिका ऑस्ट्रेलियानं ३-१ अशी जिंकली आहे. सिडनी इथं झालेल्या पाचव्या सामन्यात आजच्या तिसऱ्या दिवशी भारतीय संघानं दिलेलं १६२ धावांचं लक्ष्य ऑस्ट्रेलिया संघानं ४ गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केलं.

आज तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात झाल्यानंतर भारतीय संघ केवळ १५७ धावांवर गारद झाला. भारतीय गोलंदाज जसप्रित बुमराहला मालिकावीर तर ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज स्कॉट बोलंड याला सामनावीर किताबानं गौरवण्यात आलं.

ऑस्ट्रेलियानं बॉर्डर-गावस्कर कसोटी मालिका तब्बल दहा वर्षांनी जिंकली आहे. तसच या मालिका विजयामुळं ऑस्ट्रेलिया संघानं कसोटी विश्व करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्यांचा सामना आता दक्षिण अफ्रिकेशी होणार आहे.

**<><><><><>**

आदिवासी विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचं बक्षीस वितरण आज नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते झालं. यावेळी विविध स्पर्धांमधे चमकदार कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांचं मुख्यमंत्र्यांनी कौतुक केलं. ते म्हणाले.....

**होल्ड - बाईट - देवेंद्र फडनवीस**

महारेलने राज्यात बांधलेल्या सात उड्डाणपुलांचं लोकार्पणही आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नागपुरात झालं. यात नागपूर, वर्धा, चंद्रपूर, वाशीम, अमरावती, जळगाव आणि धुळे जिल्ह्यातल्या प्रत्येकी एका उड्डाणपुलाचा समावेश आहे. महाराष्ट्र सरकार आणि रेल्वे मंत्रालयाचा संयुक्त उपक्रम असलेल्या महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडनं ३७३ कोटी रुपये खर्चातून हे उड्डाणपूल बांधले आहेत.

नागपुरातल्या भांगडिया फाऊंडेशनच्या एनएसएच क्रिटिकल केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड डायग्नॉसिस सेंटरचं उद्घाटनही आज मुख्यमंत्र्यांनी केलं.

**<><><><><>**

श्रीलंकेत होणार असलेल्या दिव्यांग क्रिकेट करंडक स्पर्धेकरता भारतीय निवड समितीनं आज १७ दिव्यांग खेळाडूंची निवड केली असून संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी विक्रांत रवींद्र केणीवर सोपवली आहे. या स्पर्धेचा पहिला सामना १२ जानेवारीला भारत आणि पाकिस्तान या दोन संघात रंगणार असून अखेरचा सामना २१ जानेवारीला होणार आहे. दूरदर्शनवर या स्पर्धांचं थेट प्रक्षेपण केलं जाणार आहे.

**<><><><><>**

नांदेड मध्ये पाटबंधारे नगर भागात ६ एप्रिल २००६ रोजी झालेल्या स्फोट प्रकरणी नांदेड जिल्हा सत्र न्यायालयानं १२ जणांची निर्दोष मुक्तता केली आहे. या

स्फोटात दोन जण ठार झाले होते. या प्रकरणाच्या पोलीस तपासात वेगवेगळ्या बाबी पुढे आल्या होत्या. त्यानंतर तो सीबीआय कडे सोपवण्यात आल्यानंतर सी बी आयनं सखोल तपास करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केलं होतं. या खटल्याच्या सुनावणीत ४० साक्षीदारांची साक्ष घेण्यात आली, मात्र सीबीआय, हा स्फोट बॉम्बस्फोट असल्याचं सिद्ध करू शकली नाही.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यात, स्वच्छ माझे अंगण उपक्रमांतर्गत ४ लाख ७२ हजारहून अधिक कुटुंबांमध्ये स्पर्धा होणार असून येत्या प्रजासत्ताक दिनी उत्कृष्ट कुटुंबाचा सन्मान केला जाणार आहे.

बीड जिल्ह्यात १३५ गावामध्ये घन कचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन आराखड्यानुसार काम सुरू आहे. यासंबंधी ग्रामस्थांमध्ये अधिक जनजागृती होण्यासाठी १ जानेवारी २६ जानेवारी या कालावधीत स्वच्छ माझे अंगण उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमात वैयक्तिक शौचालय, शोषखड्डा, खत खड्डा, तसंच कचरा वर्गीकरणासाठी हिरव्या आणि निळ्या रंगाच्या दोन कचराकुंड्या असणारं कुटुंब हे घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनातलं उत्कृष्ट कुटुंब म्हणून सन्मानित होणार आहे.

**<><><><><>**

सक्तवसुली संचालनालयाच्या मुंबई विभागानं सुमारे ४ हजार ९५७ कोटी रुपयांच्या कर्ज व्यवहार घोटाळ्याप्रकरणी मुंबई आणि दिल्ली इथल्या १४ ठिकाणांवर छापे घातले असून त्यामध्ये प्रतिभा इंडस्ट्रीज या कंपनीच्या कार्यालयाचा समावेश आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली. विदर्भात काही ठिकाणी लक्षणीय, तर मराठवाड्यात तुरळक

ठिकाणी किंचित घट झाली. सर्वात कमी किमान तापमान नागपूर इथं८ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेल.

येत्या दोन दिवसात, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. इतरत्र हवामान कोरडं राहिल.

**//<><><><><>//**